# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/१०९९/सभ-८७/आ-४.

दिनांक : ३०.६.२०००

M. J. P.
MUMBAI-21.
RECEIVED

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा उपाध्यक्षा, म.जी.प्रा. मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा.मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव , (व्यय) वित्त विभाग तथा सदस्य म.जी.प्रा. मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नगरविकास विभाग तथा सदस्य, म.जी.प्रा. मंत्रालय,मुंबई.
सचिव,पा.पु.व स्व. विभाग तथा सदस्य, म.जी.प्रा., मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग तथा सदस्य, म.जी.प्रा. मंत्रालय, मुंबई.
सचिव, (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा सदस्य, म.जी.प्रा., मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा सदस्य, म.जी.प्रा., मंत्रालय, मुंबई-३२
सदस्य सचिव (प्रशासन व बाह्य अर्थसहाय्य), म.जी.प्रा., मुंबई-३२
सदस्य सचिव (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई.

**विषय :** दिनांक २४ मार्च,२००० रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८७व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

दिनांक २४ मार्च,२००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८७ व्या सभेचे इतिवृत्त या सोबत पाठविण्यात येत आहे.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरित कळवावेत. म्हणजे ते प्राधिकरणाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यात येतील.

**सोबत :** इतिवृत्तीची प्रत.
पृ.क्र.१ ते ६

आपला विश्वासू,

नि.कृ.माडा
(नि.कृ.माडा)
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत : माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित..**

१. मुख्य अभियंता व विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
२. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
३. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
४. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५. अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष / समन्वय/ मुख्यालय/गुणवत्ता परीक्षण पथक/यांत्रिकी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई/नवी मुंबई.
६. उप-मुख्य लेखा अधिकारी, १/२/३, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७. प्रशासकीय-नि-आस्थापना अधिकारी/कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. कक्ष/कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/३/४/५/७ व १०.

३०.६

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महा.जीवन प्राधिकरणाची ८७ वी सभा मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ मार्च २००० रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. श्री.सुनिल तटकरे, मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष.
३. श्री.व्ही.पी.राजा, सचिव, पा.पु. व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. श्री.विद्याधर कानडे, सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री.विजय कुमार अग्रवाल, सदस्य सचिव (प्रशासन), म.जी.प्रा.मुंबई.

या व्यतिरिक्त खालील विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई.
२. श्री.अ.ना.अळवणी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३. श्री.स.रा.बागल, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
४. श्री.नि.कृ.माडा, मु. प्र. अ., म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री.मिलिंद केळकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा.,मुंबई.
६. श्री.पी.के.सोनग्रा, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री.बी.टी.कांबळे, अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रय कक्ष, म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. श्री.ओ.एस.शिरुडे, उप मुख्य लेखाधिकारी (३), म.जी.प्रा., नवी मुंबई.
९. श्री. ल.पा.कालीबाग, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. श्री. ए.एन.नाईकनवरे, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरवात झाली.

## १) कार्यक्रम बाब क्र.१ : म.जी.प्रा.च्या ८६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी प्राधिकरणाच्या ८६ व्या सभेच्या प्रारुप इतिवत्तास मान्यता दिल्याचे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी स्पष्ट करुन

(४)

या इतिवृत्ताबाबत कोणास काही सुचवायचे असल्यास ते सुचविण्यांत यावेत अशी विनंती केली. तथापि उपस्थित सदस्यांनी काहीही आक्षेप न घेतल्याने मा.अध्यक्षांनी सदर इतिवृत्त सर्वांना मान्य असल्याचे स्पष्ट केले. अशा रितीने म.जी.प्रा.च्या ८६ सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

## २) कार्यक्रम बाब क्र.२ : म.जी.प्रा.च्या ८६ व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती.

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी प्राधिकरणाच्या ८६ व्या बैठकीमध्ये चर्चील्या गेलेल्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यक्रम बाबींद्वारे सादर करण्यांत आल्याचे स्पष्ट केले व ८६ व्या सभेत झालेली चर्चा व त्यावर करण्यांत आलेली कृती सारांशाने सर्व सदस्यांना अवगत केली.

या कार्यक्रम बाबीवर सर्वसाधारण चर्चा करतांना मोर्बे धरणाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या निधीबाबत पुढे काय झाले अशी विचारणा मा.अध्यक्ष महोदयांनी केली. सदस्य सचिव (प्रशासन) यांनी याबाबत खुलासा केला की, आधी ठरल्याप्रमाणे या विषयावर चर्चा करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि. १६.३.२००० रोजी सभा झाली. पण समस्येवर मार्ग निघू शकला नाही. त्यानंतर मुख्य अभियंता, ठाणे यांनी असे सांगितले की, दिनांक १६.३.२००० च्या सभेनंतर दि.१७.३.२००० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात एक सभा पुन्हा झाली, पण त्यात देखील समस्येवर मार्ग निघू शकला नाही. या संदर्भात त्यांनी पुढील बाबी सर्वांच्या पुन्हा निदर्शनास आणून दिल्या. या योजनेचे उत्तरदायीत्व सद्यस्थितीत सिडको अथवा नवी मुंबई म.न.पा. घेण्यास तयार नाही. तसेच लागणारा निधीही सिडको उपलब्ध करुन देत नाही. परिणामी हे काम रखडले आहे. तसेच सिडकोने लोकसंख्याबाढीबाबत केलेल्या अंदाजानुसार, या योजनेची आखणी केली असली तरी प्रत्यक्षांत तो अंदाज चुकल्याने, या योजनेतील पाण्याची सिडको अथवा नवी मुंबई म.न.पा.स आज गरज नाही. मात्र भविष्यात या पाण्याची गरज त्यांना लागणार आहे. त्यामुळे ही योजना राबविणे आवश्यक आहे. या योजनेवर साधारणत: रु. २८३ कोटी खर्च झाला असून या योजनेद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याची गरज आज नसल्याने या योजनेची कामे थांबविणे म्हणजेच, हे काम आहे त्या टप्प्यावर थांबविणे रास्त ठरणार नाही, ही बाब स्पष्ट करुन मोर्बे धरणाच्या कामासाठी रु. ३५ कोटी व टप्पा-३ प्रकल्पासाठी रु. १५ कोटी असे एकूा रु. ५० कोटी प्राप्त होण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन निधी प्राप्त होण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे मुख्य अभियंता, ठाणे यांनी सांगितले. तसेच या धरणाचा सिंचनासाठी उपयोग नसल्याचे मुख्य अभियंता, ठाणे यांनी मा.अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून देवून किमान १५० द.ल.लिटर्स पाणी उपलब्ध होईल, अशा पध्दतीने घळभरणीचे काम करणे जरुरीचे असल्याचे स्पष्ट केले. तसेच ही योजना प्राधिकरणाने स्वत:ची योजना म्हणून राबवणे व उपलब्ध पाण्याचा विनियोग करणे म्हणजेच या योजनेचे उत्तरदायीत्व स्वीकारणे, ही बाब धोरणात्मक असून तसे करणे शक्य नसल्याचे मुख्य सचिवांसोबत झालेल्या बैठकीमध्ये स्पष्ट केल्याचा खुलासा मुख्य अभियंता, ठाणे यांनी केला. यावर निधी उपलब्धतेबाबत पुन्हा शासन स्तरावर बैठक घेण्यांत येऊन मार्ग काढावा अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

कार्यवाही
प्रा.मु.अ., ठाणे

इतर कार्यक्रम बाबींबाबत करण्यांत आलेली कृती मान्य करण्यांत येवून, केलेल्या कार्यवाहीबाबत पाठपुरावा करावा अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी केल्या.

**३) कार्यक्रम बाब क्र.३ : म.जी.प्रा.ची सध्याची आर्थिक परिस्थिती.**

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यासाठी विविध मार्गांनी किती निधी प्राप्त होणार होता, आतापर्यंत प्रत्यक्षात किती निधी प्राप्त झाला, त्याचा विनियोग कसा करण्यांत आला व अद्याप किती निधीची आवश्यकता आहे, याबाबतची सविस्तर माहिती या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केल्याचे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

मार्च २००० मध्ये सुमारे रु. ५२ कोटीच्या कर्ज परतफेडीची जबाबदारी प्राधिकरणावर असून १५ मार्च २००० रोजी अंदाजे रु. २०० कोटींची कंत्राटदारांची पारित देयके अदा करणे, निधीअभावी प्रलंबित असल्याने शासनाकडे मंजूर तरतुदीनुसार प्राप्त व्हावयाचे अनुदान पूर्णपणे प्राप्त होणे आवश्यक असल्याचे सांगण्यांत आले. मंजूर निधी पूर्णपणे उपलब्ध करुन देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत येतील असे मा.अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले.

या अनुषंगाने चर्चा करतांना मा.अध्यक्ष महोदयांनी, कंत्राटदारांनी देयके मिळण्यासाठी आंदोलने वा धरणे असे मार्ग अवलंबू नयेत असे अभिप्राय व्यक्त केले.

कार्यवाही:
वि.स.मु.ले.अ.

स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असणा-या थकबाकीच्या वसुलीसंबंधी चर्चा करतांना मा.अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले की, नगरपालिकांना व जिल्हापरिषदांना शासनाकडून जे अनुदान देण्यांत येते, त्यातील काही निधी प्राधिकरणाच्या थकबाकीपोटी कपात करुन तो प्राधिकरणास उपलब्ध करुन दिला जाईल, याबाबत प्रयत्न करण्यांत येतील. तथापि महानगरपालिकांकडे असणारी थकबाकी वसूल होण्यासाठी मुख्य सचिवांकडे सचिव, वित्त व व्यय, तसेच सचिव, नगर विकास व संबंधित म.न.पा. आयुक्त यांच्या बैठकीचे सत्वर आयोजन करुन मार्ग काढावा अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. तसेच ज्या थकबाकीमध्ये मतभिन्नता नाही अशी थकबाकी तरी म.न.पा.कडून सत्वर देण्यांत यावी यासाठी प्रयत्न करावेत असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

कार्यवाही :
स.स.(प्र.व अ.)

या कार्यक्रम बाबींवर चर्चा करतांना सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी निदर्शनास आणून दिले की, सोलापूर म.न.पा. त्यांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी हुडकोकडून घेण्यांत आलेल्या कर्जाच्या हप्त्याची व व्याजाची परतफेड करत नाही. परिणामी इतर पाणी पुरवठा योजनांसाठी हुडकोकडून कर्ज प्रस्तावास मान्यता मिळणे अवघड होत आहे. तसेच हुडकोकडून प्राप्त होणा-या कर्जास शासनाची हमी आहे. त्यामुळे सोलापूर म.न.पा.ने कर्ज परतफेडीबाबत नकारात्मक भूमिका घेणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी मार्ग काढण्यासाठी आयुक्तांसोबत बैठक बोलाविण्यांत यावी, अशा सूचना मा.मंत्रीमहोदयांनी दिल्या.

चर्चेच्या ओघात, सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी स्पष्ट केले की, आज प्राधिकरण शासनाकडून मिळणा-या निधीवर पूर्णपणे अवलंबून आहे. तथापि प्राधिकरणाने शुध्द पाणी बाटल्यात भरुन ते विकून स्वतःचा निधी उभा करण्याचा किंवा स्वतःची मालमत्ता विकसित करुन निधी प्राप्त होण्याचा स्त्रोत तयार करण्याबाबत विचार करावा. यावर सदस्य सचिव (प्रशासन) यांनी त्यांच्या पूर्वअनुभवावरुन स्पष्ट केले की, स्वतःची मालमत्ता

विकसित करणे, अगर शुध्द पाण्याची विक्रीसाठी प्रकल्प उभा करणे किंवा प्रायोगिक तत्वावर स्पर्धात्मकरित्या सार्वजनिक क्षेत्रात उतरणे ही बाबत तितकीशी सोपी वा सहज साध्य नाही. अशी कामे करतांना शासनाचा उपक्रम म्हणून येणा-या मर्यादा यांचा विचार करता असे प्रकल्प राबविणे शक्य नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावर मा.अध्यक्ष महोदयांनी असे सुचविले की, प्रायोगिक तत्वावर असे प्रकल्प हाती घेणे शक्य आहे किंवा कसे याबाबत सल्लागारांमार्फत चाचपणी करण्यांत यावी व प्रस्ताव तयार करावेत. त्यानंतर या प्रकरणी आढावा घेण्यांत यावा असे ठरविण्यांत आले.

मा.अध्यक्षांनी असेही सुचविले की, मार्च अखेरपर्यंत जिल्हापरिषदांकडील थकबाकीपैकी किमान २५ कोटी तर म.न.पा./न.पा. कडील थकबाकी पैकी किमान रु. ५० कोटी वसूल करण्याचा प्रयत्न करावा. या व्यतिरिक्त नगरपालिकांना जकातीपोटी जे अनुदान देय असते, त्यापैकी काही रक्कम (२५ टक्के) म.जी.प्रा.कडे वर्ग करण्याचाही विचार होणे गरजेचे आहे, असेही मा.मंत्रीमहोदयांनी सांगितले. त्यावर सचिव, वित्त यांनी याबाबत विचार करण्यांत येईल असे सांगितले.

## ४) कार्यक्रम बाब क्र.४ : म.जी.प्रा.चे सन १९९९-२००० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०००-२००१ चे अंदाजपत्रक.

म.जी.प्रा.चे अंदाजपत्रक महसूली व भांडवली या दोन भागामध्ये विभागलेले असून त्यांची सविस्तर माहिती या कार्यक्रम बाबीद्वारे दिली असून सन १९९९-२००० च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०००-२००१ च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली.

या प्रकरणी सर्वसाधारण चर्चा करण्यांत येवून प्राधिकरणाच्या सन १९९९-२००० च्या सुधारित व २०००-२००१ च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत आली. मंजुर अंदाजपत्रकातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**(रु. लाखात)**

| अ. क्र. | तपशील. | ९९-२००० चे सुधारित अंदाजपत्रक. | २०००-२००१ चे अंदाजपत्रक. |
|---|---|---|---|
| १. | महसूली मिळकत. | ४३५८९.६२ | ४०३००.५५ |
| २. | महसूली खर्च. | ३४५५१.४३ | ३७४६१.०६ |
| ३. | भांडवली मिळकत. | १५९६६५.११ | १०६४४७.०२ |
| ४. | भांडवली खर्च. | १५९६६५.११ | १०६४४७.०२ |
| ५. | अधिक्य. | ९०३८.१९ | २८३९.४९ |

**५) कार्यक्रम बाब क्र.५ : म.जी.प्रा.च्या प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर सन २०००-२००१ करिता सुधारित करणेबाबत.**

**व**

**६) कार्यक्रम बाब क्र.६ : म.जी.प्रा.च्या प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर सन २०००-२००१ करिता सुधारित करणेबाबत.**

कार्यक्रम बाब क्र.५ व ६ या अन्वये सादर करण्यांत आलेली माहिती एकमेकांशी निगडीत असल्याने या दोन्ही कार्यक्रम बाबींवर एकत्रित चर्चा करण्यांत आली. सुरुवातीपासूनच प्रकल्प क्षेत्रामध्ये असणा-या पाणी पुरवठ्याचे दर हे प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठ्याच्या दरापेक्षा जास्ती आहेत. कारण प्रकल्प क्षेत्रामध्ये होणा-या पाणी पुरवठ्यापोटी येणारे जास्तीचे उत्पन्न प्रकल्पक्षेत्राबाहेरील पाणी पुरवठ्यासाठी (ज्या मध्ये ग्रामीण भागाचा समावेश आहे) वापरण्यांत येते, जेणेकरुन ग्रामीण भागास कमी दराने पाणी उपलब्ध करुन देणे शक्य होते. विद्यमान दर हे १.५.१९९९ पासून अंमलात आले असून या दरामध्ये २० टक्के वाढ करण्यांत येवून नवीन दर १.५.२००० पासून अंमलात आणणे प्रस्तावित असून त्यास मान्यता मिळावी म्हणून या दोन्ही कार्यक्रम बाबी सादर करण्यांत आल्याचे स्पष्ट केले.

बाजारामध्ये निर्देशांकामध्ये होणारी वाढ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वीज दरामध्ये होणारी वाढ विचारात घेवून २० टक्के दरवाढ प्रस्तावित केली असल्याचे सर्वांच्या निदर्शनास आणून दिले असता, एकदम २० टक्के दरवाढ न करता साधारणतः १५ टक्के दरवाढ करावी व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने जर विद्युत दरात खूपच असाधारण वाढ केली तर, पुन्हा दरवाढीबाबत विचार करावा असे अभिप्राय मा.अध्यक्षांनी व्यक्त केले. यावरुन असे केल्यास मिळणारा महसूल व खर्च याचे साधारण स्वरुप काय राहील याची माहिती सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगितली. तसेच मुंबई महानगरपालिकेनेही त्यांच्या पाणी दरात बरीच वाढ केल्याचे निदर्शनास आणून दिले. तथापि एकाच वेळी अशी २० टक्के दरवाढ करणे रास्त ठरणार नाही, असे ठरल्यानंतर विद्यमान पाणी दरात १५ टक्के वाढ करण्यांत यावी व हे दर १.५.२००० पासून लागू करण्यांत यावेत. असा निर्णय घेण्यांत आला व दोन्ही कार्यक्रम बाबींना मान्यता देण्यात आली. १५ टक्के दरवाढ न्हावा शेवा योजनेसाठी सुध्दा लागू राहील.

प्रसंगानुरुप या प्रकरणी चर्चा करतांना सदस्य सचिव (प्रशासन) यांनी मा.अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून दिले की, प्रकल्प क्षेत्रातील टेमघर पाणी पुरवठा केंद्र, राज्य शासनाच्या आदेशानुसार दिनांक २३.३.२००० रोजी हस्तांतरित झाले आहे, मात्र या ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना कायमस्वरुपी हस्तांतरित करुन घेतले नसल्याने या कर्मचा-यांचा भार भविष्यात प्राधिकरणावर पडणार आहे. यावर मा.अध्यक्षांनी सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांना सूचना दिल्या की, या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी कार्यरत असणारा सर्व कर्मचारी वर्ग कायमस्वरुपी हस्तांतरित व्हायला हवा, याबाबीचा विचार करुन आवश्यक असल्यास सुधारित शासन निर्णय निर्गमित करावा. यावर सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी या प्रकरणी सविस्तर माहिती घेवून कार्यवाही करण्याचे मान्य केले.

**कार्यवाही :**
**पा.पु.व स्व.वि.**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने चर्चा करतांना पुणे, नागपूर, जळगांव, नाशिक इत्यादी म.न.पा. त्यांच्या पाणी पुरवठा योजना स्वतः राबवित असल्याने त्याच धर्तीवर इतरही काही नगरपालिका/ महानगरपालिकांनी त्यांच्या पाणी पुरवठा योजना स्वतः राबविण्यास मान्यता द्यावी अशी मागणी केल्याचे मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.विभाग यांनी सांगितले. प्राधिकरण ज्या पाणी पुरवठा योजना राबविते. त्यावर झालेल्या खर्चाचा १७.५ टक्के आस्थापना व अवजारे पोटी आकारणी करते. मात्र महानगरपालिकांनी त्यांची पाणी पुरवठा योजना स्वतः राबविल्यास त्यांना ४ ते ५ टक्के खर्च येतो असे महानगरपालिकांचे म्हणणे आहे. तथापि अशा मागणीचा विचार झाल्यास प्राधिकरणाने काय काम करावयाचे हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे यापुढे कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या पाणी पुरवठा योजना त्यांनी स्वतः राबविण्यास मान्यता देण्यांत येवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यांत यावा असे मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले व त्यास सर्वांनी मान्यता दिली. प्राधिकरणाने ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी व पाठपुरावा करावा असेही ठरविण्यांत आले. याबाबत सचिव, पा.पु. व स्व. यांनी असे मत माडले की, दूरगामी विचार करता असा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही.

**कार्यवाही :**
**सर्व मु.अ.**

या प्रकरणी चर्चा करतांना मुख्य अभियंता, ठाणे यांनी मुद्दा मांडला की, नगरपालिका फंडामधून, नगरपालिका स्टेडीयम, कॉन्क्रीटचे रस्ते, शॉपिंग सेंटर्स यासारखी कामे हाती घेतात, ज्याची तांत्रिक मंजुरी प्राधिकरणाकडून देण्यांत येते. अशी कामे करण्यास नगरपरिषदेकडे निधी उपलब्ध असतो, पण प्राधिकरणाची थकबाकी देण्यास नगरपरिषद टाळाटाळ करते. यावर मा.मंत्री महोदयांनी सूचना दिल्या की, नगर विकास विभागाने अशा प्रकरणांचा विचार करणे जरुरीचे असून थकबाकी प्रलंबित असणा-या नगरपालिकांच्या अशा कामांना प्राधिकरणाने तांत्रिक मंजुरी देऊ नये. याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच नगर विकास विभागास अवगत करावे. तसेच अशा कामांना निधी मुक्त करतांना पाणी पुरवठ्यापोटी असणा-या थकबाकीपोटी निधी वळता करणेबाबत विचार व्हावा, अशा सूचना सचिव, वित्त व व्यय यांना मा.मंत्रीमहोदयांनी केल्या. यावर विचार करण्याचे सचिव, वित्त व व्यय यांनी मान्य केले.

एकंदरित पाणी पुरवठा योजनांसाठी खाजगी गुंतवणुकीचा रस्ता खुला करणे किंबहुना या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक होणे ही काळाची गरज असून म.जी.प्रा.कडून चालविण्यांत येणा-या काही पाणी पुरवठा योजना दैनंदिन देखभाल व व्यवस्थापनासाठी खाजगी संस्थांना द्याव्यात यावर विचार व्हावा, असा प्रस्ताव, सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी मांडलो. यावर मा.मंत्रीमहोदयांनी असे सुचविले की, सध्या ज्या योजना म.जी.प्रा.तर्फे चालविण्यांत येतात, त्यापैकी १ - २ योजना, ज्यामधील अेक योजना जेमतेम ना नफा ना तोटा या तत्वावर चालविली जात आहे, तर दुसरी तोटयात चालत असलेली योजना प्रायोगिक तत्वावर खाजगी संस्थेकडे चालविण्यांस देण्याबाबत विचार व्हावा. तसेच असा प्रस्ताव सादर झाल्यास त्यास मान्यता देण्याबाबत जरुर विचार होईल असे अभिप्राय त्यांनी व्यक्त केले. मात्र फायद्यामध्ये चालणा-या योजनेचा या प्रकरणी विचार करु नये असेही त्यांनी स्पष्ट केले.

वरीलप्रमाणे सर्व प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चा झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानण्यांत आले व सभा संपल्याचे घोषित करण्यांत आले.

sabha-८७/final